दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● गुरुवार दि.२५ डिसेंबर २०२५ ● 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक १२१ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi ● Thrusday 25 December 2025 ● 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 121 ● Pages 4 ● Rate 4 Rs

## वर्षानुवर्षांची मेहनत आगीत भस्म

**मुंबई**–आपल्या अभिनयासोबतच वृक्षारोपणाच्या चळवळीसाठी ओळखले जाणारे अभिनेते सयाजी शिंदे यांनी बीड जिल्ह्यातील पालवण डोंगररांगेत उभ्या केलेल्या 'सह्याद्री देवराई' प्रकल्पाला आज सायंकाळी भीषण आग लागली. या आगीने रौद्ररूप धारण केले असून, यात हजारो झाडे, दुर्मिळ औषधी वनस्पती आणि असंख्य पशू-पक्षी होरपळून गेल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. सयाजी शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून घेतलेल्या अपार मेहनतीवर या आगीमुळे अक्षरशः पाणी फेरले गेले आहे.सायंकाळच्या सुमारास पालवण डोंगरावर अचानक धुराचे लोट दिसू लागले. उन्हाळ्याचे दिवस आणि वाऱ्याचा वेग जास्त असल्याने काही क्षणांतच आगीने संपूर्ण देवराई प्रकल्पाला वेढले. ही आग इतकी भीषण होती की, दुरूनच आगीच्या ज्वाळा आकाशात झेपावताना दिसत होत्या. घटनेची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थ आणि वनविभागाचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

# मराठी माणसाच्या अस्तित्वावर उठलेल्यांना गाडून टाकण्यासाठी युती केली




## मुंबईचा महापौर हा शिवसेना-मनसेचाच असणार; राज ठाकरेंनी मांडली भूमिका

**मुंबई (वृत्तसंस्था)–मुंबईत महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेना, या दोन पक्षांची आगामी महापालिका निवडणुकांसाठीची युती घोषित झाली. महाराष्ट्र नवनिर्माण सेना अध्यक्ष म्हणून मी आणि शिवसेना पक्षप्रमुख म्हणून उद्धव ठाकरे अशी आम्ही दोघांनी या युतीची अधिकृत घोषणा संयुक्त पत्रकार परिषदेत केली, अशी माहिती मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी त्यांच्या सोशल मीडिया पोस्टद्वारे केली आहे. राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत युती संदर्भात तसेच आगामी महापालिकेच्या अनुषंगाने आपले मत व्यक्त केले आहे. तसेच मराठी माणसाच्या अस्तित्वावर उठलेल्यांना गाडून टाकण्यासाठी युती केली असल्याचे त्यांनी म्हटले आहे.**

राज ठाकरे म्हणाले, ही युती बहुचर्चित आणि बहुप्रतीक्षित होती. आणि या सगळ्याची सुरुवात, मी एका मुलाखतीत दिलेल्या वाक्यातून झाली. कुठल्याही वादापेक्षा आणि भांडणांपेक्षा आपला महाराष्ट्र आणि मराठी माणूस मोठा आहे.' हे माझं वाक्य होतं. हे निव्वळ मुलाखतीतलं वाक्य नाहीये, तर ही तीव्र भावना आहे आणि यातूनच हे २ पक्ष एकत्र आले आहेत. बाकी युतीची घोषणा झाली. आता कोणाला कुठल्या आणि किती जागा मिळणार याची उत्तरं लवकरच मिळतील. त्यावर आजच्या व्यासपीठावर कुठलीही माहिती सांगितली नाही, कारण त्या तांत्रिक बाबी आहेत.युती ही किती जागा, कुठल्या जागा यासाठी नाहीये. ती आज मराठी माणसाचं मुंबई आणि परिसर पण उद्या राज्याच्या इतर भागातून अस्तित्व मिटवण्याचा जो प्रयत्न सुरु आहे, त्या शक्तींना गाडून टाकण्यासाठीची ही युती आहे. त्यामुळे जागावाटप आणि त्याचा तपशील योग्य वेळी संबंधित व्यक्ती घोषित करतील.ही दोन पक्षांची लढाई नाही तर ही मराठी माणसाची लढाई आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळेस जशी तत्कालीन माध्यमं मराठी माणसाच्या पाठीशी उभी राहिली तसं यावेळेस तुम्ही उभे रहा. कारण मराठी भाषा आणि मराठी माणूस टिकला तर तुमचं अस्तित्व टिकेल. सभांच्या वेळेस मराठी बांधव-भगिनींच्या दर्शनाचा योग येईलच. तोपर्यंत सर्वांना सस्नेह जय महाराष्ट्र, असे राज ठाकरे यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटले आहे.


### मराठी माणसाच्या विरोधात जे षडयंत्र सुरु आहे

मुंबईचा महापौर हा महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेनेचा असेल आणि तो निर्विवादपणे मराठीच असेल. आज वर्तमानपत्रं असोत किंवा वृत्तवाहिन्या, त्यांचे बहुसंख्य संपादक, पत्रकार आणि तिथे काम करणारी इतर मंडळी ही कडवट मराठी प्रेमी आहेत. आणि त्यांना मराठी भाषेच्या विरोधात आणि मराठी माणसाच्या विरोधात जे षडयंत्र सुरु आहे ते आवडत नाहीये. त्यातले अनेक जणं त्यांचा रोष त्यांच्या पत्रकारितेतून व्यक्त करतात, तर काही खाजगीत व्यक्त होतात. माझी सगळ्यांना विनंती आहे की यावेळेस तुमच्या मालकांना आणि त्यांच्या मालकांना काय वाटतं यापेक्षा तुमच्या सद्सद्विवेक बुद्धीला काय वाटतं, पटतं तेच मांडा, बोला.

## नवापूरच्या विकासाचा आधारवड कोसळला ज्येष्ठ लोकनेते सुरूपसिंग नाईक यांचे निधन

दैनिक वादळ वार्ता
**नवापूर । मोहसीन शेख**

नवापूर विधानसभा मतदारसंघाचे सलग नऊ वेळा प्रतिनिधित्व करणारे, आदिवासी जनतेचे कैवारी आणि राज्याच्या राजकारणातील ज्येष्ठ नेतृत्व माजी मंत्री सुरूपसिंग हिऱ्या नाईक यांचे दिनांक २४ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे केवळ नवापूर तालुक्यावरच नव्हे, तर संपूर्ण खान्देशावर शोककळा पसरली आहे. आदिवासी समाजाचा एक बुलंद आवाज आणि विकासाचा ध्यास घेतलेला लोकनेता हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.



१९७८ पासून सुरू झालेला सुरूपसिंग नाईक यांचा राजकीय प्रवास हा जनसेवेचा एक आदर्श वस्तुपाठ होता. तब्बल ३५ वर्षांहून अधिक काळ त्यांनी नवापूर मतदारसंघाचे आमदार म्हणून नेतृत्व केले.

या प्रदीर्घ काळात त्यांनी राज्याच्या मंत्रिमंडळात विविध महत्त्वाची पदे भूषवली. मात्र, मंत्री किंवा आमदार या पदांपेक्षा जनतेचे 'दादा' ही त्यांची ओळख अधिक गडद होती. नवापूरच्या दुर्गम डोंगरदऱ्यांत विकासाची गंगा पोहोचवण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी या जोरावर त्यांनी सामान्यांच्या हृदयात अढळ स्थान निर्माण केले. २००९ नंतर राजकीय समीकरणे बदलली असली, तरी नवापूरच्या मातीशी असलेली त्यांची नाळ कधीही तुटली नाही. शेवटच्या श्वासापर्यंत ते जनतेच्या सुख-दुःखात सहभागी राहिले.

विधिमंडळात आदिवासींच्या प्रश्नांवर आक्रमकपणे भूमिका मांडणारे नेतृत्व म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांच्या निधनाने एका झंझावाती पर्वाचा अंत झाला असून, जनसेवेचा एक आदर्श दीपस्तंभ निमून गेला आहे. त्यांच्या पश्चात मोठा परिवार आणि दांडगा जनसंपर्क असून, संपूर्ण खान्देशातून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे. एका जनसेवकाचा प्रवास थांबला असला, तरी त्यांनी लावलेले विकासाचे रोपटे आज वटवृक्ष झाले आहे. त्यांच्या जाण्याने नवापूरच्या राजकारणात कधीही न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली आहे.

## खरा तो एकची धर्म,जगाला प्रेम अर्पावे ही साने गुरुजींची शिकवण सर्वांच्या कृतीत आली पाहिजे-डॉ.हनुमंत सौदागर

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे ही साने गुरुजींची शिकवण आपल्या सर्वांच्या कृतीत आले पाहिजे असे मत डॉ हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले ते भाऊसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालयात साने गुरुजी जयंती कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बोलत होते.



कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती प्राचार्य श्रीकांत लुंगारे,अधिव्याख्याता नारायण चोले ,लामतुरे ओ एस, बलाढ्ये यु. बी.,कचरे जे एस, जगदाळे एम. एच.,वामन चिगुरे,सुजित नाईकवाडे, सतीश नेहरकर आदी उपस्थित होते.छात्र अध्यापक सोनम सोनवणे, ऋतुजा इंगळे, पुनम यादव अक्षय राऊत,सुप्रिया पवार आदी विद्यार्थ्यांनी विचार मांडले. पुढे बोलतांना ते म्हणाले शेतकरी, कष्टकरी ,वंचित उपेक्षितांसाठी आयुष्यभर लढा देणारे साने गुरुजी साहित्यातून वास्तवदर्शी जीवन मांडत राहिले. विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन सेवाकार्याचा वसा सांभाळावा असे मत त्यांनी व्यक्त केले कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक ग्रंथपाल संतोष कुमार साळवी यांनी केले तर आभार रमेश रितपुरे यांनी मानले.

## तहसील कार्यालय येथे ग्राहक दिन उत्साहात साजरा



दैनिक वादळ वार्ता
**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तहसील कार्यालय येथे ग्राहक पंचायत महाराष्ट्र व तहसील कार्यालय गेवराई यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २४ डिसेंबर बुधवार रोजी राष्ट्रीय ग्राहक दिन आनंदाने, उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम विवेकानंद प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. माननीय ग्राहक तीर्थ बिंदू माधव जोशी यांच्या संघटकाची आष्टाध्यायी पुस्तकाचे प्रकाशन( विमोचन) सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी गेवराई ग्राहक पंचायत कार्याचा आढावा उपस्थिता समोर मांडण्यात आला. ग्राहकाने मोठ्या प्रमाणात संघटन करून आपल्या सेवा उपलब्ध करून घेणे काळाची गरज आहे. त्यासाठी ग्राहक पंचायत कार्यात सर्वांनी सहभागी होणे गरजेचे आहे असे सांगितले. तसेच प्राचार्य डॉ. विजयकुमार बांदल यांनी ग्राहक संरक्षण कायदा १९८६ बद्दल सविस्तर माहिती दिली. ग्राहक संरक्षण कायद्याचा जास्तीत जास्त ग्राहकाने लाभ घेणे गरजेचे आहे असे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर जोशी व आभार प्रदर्शन नायब तहसीलदार पुरवठा श्री गजानन मोरे साहेब यांनी केले. या कार्यक्रमास ग्राहक पंचायत पदाधिकारी बीके तावस्कर, विश्वास चपळगावकर, वल्लभ तौर, योगेश कापसे, पांगरे तात्या आदी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## शेवडी (बा) येथे कै.देवराव शिवराम आप्पा चपटे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त भव्य कीर्तन सोहळा संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

लोहा तालुक्यातील शेवडी (बा) येथे शिवैक्य कै. देवराव शिवराम आप्पा चपटे यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त शेवडी बा येथील पवित्र श्री काशी विश्वनाथ संस्थान मंदिरात भव्य कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी शिवा राष्ट्रीय भूषण पुरस्कार प्राप्त युवा प्रबोधनकार व ख्यातनाम कीर्तनकार शि.भ.प. विश्वनाथ महाराज स्वामीजी (पेनुरकर) यांची प्रभावी कीर्तन सेवा संपन्न झाली.सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत पार पडलेल्या या कीर्तनाने उपस्थित शेकडो भाविक मंत्रमुग्ध झाले. कीर्तनास विरशैव हृदयसम्राट प्रा. मनोहर धोंडे सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमास विशेष शोभा प्राप्त झाली.कीर्तनात बोलताना विश्वनाथ महाराज स्वामीजी यांनी मानवी जीवनाचे मोल विशद करताना संतवचनांचा सुंदर आशय उलगडला.

जाणे आहे हा सर्वांशी!
करा विचार मनाशी!!



कार्य साधुनिया घ्यावो!
दुर्लभ नरजन्म हा हो!!

हा अभंग सादर करत त्यांनी नरजन्माचे महत्त्व पटवून दिले. गरजूंची मदत करणे, लेकरांना उत्तम संस्कार देणे, समाजात सदाचार रुजविणे यावर त्यांनी भर दिला. घराघरात शिवभक्तीचे बीज पेरण्याचे कार्य विश्वनाथ महाराज स्वामीजी सातत्याने करीत असून, हा कोणाचा कोणाचा असा विचार न करता हा आमुचा, हा आमुचा असे म्हणत आपल्या धर्माचे आचरण करणे गरजेचे आहे. प्रत्येकाने लिंगधारणा करून शिवमार्गावर चालावे, असा संदेश त्यांनी कीर्तनातून दिला.

या कीर्तन सोहळ्यास पंचक्रोशीतील अनेक गावांतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. कीर्तनात शिवा मावळे, गायक, वादक, टाळकरी व विविध भजनी मंडळांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता. कीर्तनानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसाद भोजनाचा कार्यक्रम पार पडला. सर्व भाविकांनी समाधानाने महाप्रसादाचा लाभ घेतला. कै. देवराव शिवराम आप्पा चपटे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित करण्यात आलेला हा कीर्तन सोहळा अध्यात्मिक उन्नती, समाजप्रबोधन आणि शिवभक्तीचा जागर घालणारा ठरला.

संपादकीय

# हवा मुंबईची

वायुप्रदूषणाची अखेर मुंबई उच्च न्यायालयाने दखल घेतली. प्रथम दर्शनी अहवालात कोणत्याही निकषाचे पालन केले नाही असे नमूद केले. हवेची गुणवत्ता राखण्याबाबत जे काही निकष आहेत त्यांचे अनुपालन केले जात नाही आणि प्रदूषण नियंत्रणाबाबत ज्या काही मार्गदर्शक सूचना आहेत यांचे पालन केले जात नाही असे न्यायालयाच्या निदर्शनास आले. ही गंभीर बाब आहे आणि राज्य सरकारला त्याचे उत्तर द्यावे लागणार. ३६ स्थळांचा उल्लेख न्यायालयाने आपल्या आदेशात केला आणि त्यासाठी कारण दिले, ते मुंबईतील बांधकामे आणि विकास प्रकल्पाची कामे. सबका साथ सबका विकास ही घोषणा मोदी सरकारची आहे आणि त्यानुसारच राज्य सरकार आणि केंद्र सरकार काम करते, त्याबद्दल त्यांचे कौतुक करायला हवे. पण त्याचवेळी लोकांना श्वास घेता येऊ नये असा विकास उपयोगाचा नाही याकडे दुर्लक्ष होऊ देता कामा नये असे न्यायालयाच्या निरीक्षणानंतर सरकारच्या लक्षात आणून देण्याचा न्यायालयाने प्रयत्न केला. मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी आणि राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांना न्यायालयात हजर राहण्याचे समन्स न्यायालयाने बजावले आहे आणि त्यात ते काय सांगतात त्यावर पुढील भूमिका ठरेल. न्यायालयाने म्हटले आहे, की महापालिका आयुक्त आणि एमपीसीबी अधिकाऱ्यांनी वैयक्तिकदृष्ट्या हजर राहून या अनास्थेप्रती स्पष्टीकरण दिले पाहिजे. आता अनेक ठिकाणी बांधकाम थांबवण्याच्या नोटिसा देण्यात आल्या असून अनेक बांधकामे थांबवण्यात आली. ही बांधकामे धूळ आणि डेब्रिस म्हणजे मलबा तयार करत होती. त्यामुळे परिसरातील नागरिकांना श्वास घेण्यासही त्रास होत होता. न्यायालायाचा आदेश म्हणजे मुंबई महापालिका आणि प्रदूषणाबाबत साऱ्याच उदासीन यंत्रणांना चपराक आहे. कारण अशी प्रदूषणाबाबतची बेफिकिरी आपण उत्तर प्रदेशात किंवा अन्य राज्यात पाहतो. पण मुंबईसारख्या सुशिक्षित आणि विकासाच्या वाटेवर धावणाऱ्या शहरात न्यायालयच काय कुणीही खपवून घेणार नाही. प्रदूषण आटोक्यात आणण्यावर जी मार्गदर्शक तत्त्वे आहेत त्याकडे सर्रास दुर्लक्ष केले जाते, हे न्यायालयाचे निरीक्षण आहे आणि हे आपल्या सुनियोजित शहर म्हणून आणि सुजाण नागरिकांप्रती असलेल्या जबाबदारीकडे कसे दुर्लक्ष करतो याचे व्यवच्छेदक लक्षण आहे. मुंबईच नव्हे तर नवी मुंबई हेही प्रदूषणाचे आगर होत आहे आणि याचीही दखल न्यायालयाने घेतली. मुंबईतील प्रदूषणाकडे सर्रास दुर्लक्ष होण्याचे कारण आणि देखरेखीकडे संपूर्ण दुर्लक्ष होण्याचे कारण म्हणजे बांधकाम करण्याची घाई आणि त्यासाठी प्रदूषणाकडे साफ दुर्लक्ष करण्याच्या यत्रणांना लागलेली सवय. कारण प्रदूषणाकडे दुर्लक्ष करून लोकांना श्वास घेण्यास त्रास होत आहे याकडे डोळेझाक करून कामे आटपायची घाई नडत आहे. मुबईतील हवेची खराब गुणवत्ता याला सरकार तर काही करू शकत नाही. पण बांधकामे थांबवून आणि प्रदूषणाच्या गाईडलाइन्सकडे दुर्लक्ष न करता त्यांचे अनुपालन करणे हे तर सरकारच्या हातात आहे. असे झाले तरी कितीतरी मुंबईची हवा नागरिकांसाठी सुसह्य होईल. वाद्रे-कुर्ला प्रकल्प आणि मेट्रो प्रकल्प आणि बुलेट ट्रेन या तीन प्रकल्पांची पाहणी केली असता असे निदर्शनास आले, की संपूर्ण ठिकाणी अनुपालन केले जात नव्हते आणि एअर पोल्युशन म्हणजे प्रदूषणाची मार्गदर्शक तत्त्वे धाब्यावर बसवली जात होती. महापालिका आणि एमपीसीबीच्या अधिकाऱ्यांनी महापालिकेच्या निष्क्रियतेबाबत स्पष्टीकरण द्यावे असे न्यायालयाने राज्य सरकारला खडसावले. अर्थात मुंबई महापालिकेला विकासकामे हवीत आणि ती नागरिकांच्या दृष्टीने सोयीची आहेत आणि मुंबईकरांना जलद प्रवास करण्याकरिता ही बुलेट ट्रेन आणि मेट्रो हवीच आहे. पण त्याचवेळी पर्यावरणाची काळजी आणि रेल्वे विस्तार, कोस्टल रोड तसेच नवी मुंबई विमानतळ करताना प्रदूषणाचा विचार व्हावा असा न्यायालयाचा विचार योग्यच आहे पण अशी कामे करताना प्रदूषणाकडे दुर्लक्ष होता कामा नये असे न्यायालयाचे मत आहे आणि न्यायालय विकासाच्या विरोधात नाही पण पर्यावरणपूरक मुंबईच्या ऐतिहासिक ओळखीला धक्का न लावता तो केला जावा असे न्यायालयाचे मत आहे. विकास थांबवता येणार नाही. प्रदूषणाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करता येणार नाही हेच न्यायालयाने सांगण्याचा प्रयत्न केला आहे. काही वर्षांपूर्वी मुंबईला विकास हवा की विनाश असा प्रचार काही पक्षांनी चालवला होता. पण मुंबई आता जागतिकदृष्ट्या सर्वात वेगाने होणारे विकसित शहर आहे, जसे अधोरेखित झाले तशी ही चर्चा मागे पडली. पण मुंबई आता विकासाच्या वाटेवर आहे त्यामुळे येथील प्रदूषणाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करूनही चालणार नाही हेही स्पष्ट झाले आहे. न्यायालयाने आता जो आदेश दिला आहे तो या आनुषंगाने आहे, की मुंबईचा चेहरा बदलत आहे हे मान्य करायला हवे, पण लोकांचा जीवही तितकाच महत्त्वाचा आहे आणि त्याकडे डोळेझाक करता येणार नाही. अन्यथा हरिद्वार किंवा उत्तराखंडसारखी परिस्थिती इथेही निर्माण होईल. तशी ती होऊ द्यायची नाही हे आपल्या हाती आहे. सुरक्षित मुंबई हे देवेंद्र फडणवीस यांचे मिशन आहे. त्याला बाजूला टाकून काहीच करता येणार नाही हेच न्यायालयाने ताज्या आदेशात सांगितले. दिल्ली, मुंबई आणि अन्य कोणतेही मेट्रो महानगर येथील प्रदूषणाची तीच कारणे आहेत म्हणजे विकासाच्या वेगात आपण हरवून चाललो आहोत आणि त्यात आपल्याला फक्त वेग मागे पडू नये इतकीच चिंता आहे. दिल्ली, मुंबई असो किंवा नाशिक, पुणे तेथे आपले एकच ध्येय आहे ते म्हणजे या स्पर्धेत पुढे निघून जायचे. पण त्यात आपण आपल्याच नागरिकांचा जीव धोक्यात घालत आहोत याचं भानही असू द्या.




**शिवसेना नेते प्रा. टी.पी.मुंडे सर यांच्या निवासस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नेते दीपक देशमुख यांची सदिच्छा भेट घेतली व प्रा.टी.पी मुंडे व मा.जयश्रीताई मुंडे/ गीते यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला त्याप्रसंगी दीपक नाना देशमुख, प्रदीप उर्फ बबलू शेठ मुंडे, गोविंद माने आधी दिसत आहेत**

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणुकीची धुरा खासदार बजरंग सोनवणे यांच्या खांद्यावर

**दैनिक वादळ वार्ता**
**पुणे | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांनी आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या दृष्टीने संघटनात्मक तयारीला गती देण्यास सुरुवात केली असून, त्याचाच भाग म्हणून छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या 'निवडणूक प्रभारी'पदी खासदार बजरंग सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे यांच्या मान्यतेने जाहीर करण्यात आली.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणूक पक्षासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जात असून, शहर व परिसरात पक्ष संघटना अधिक सक्षम करण्याची जबाबदारी खासदार सोनवणे यांच्यावर सोपविण्यात आली आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते, नगरसेवक तसेच विविध सामाजिक घटकांशी समन्वय साधत प्रभावी निवडणूक रणनीती राबविण्याचे आव्हान त्यांच्यासमोर असणार आहे. या नियुक्तीबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना खासदार बजरंग सोनवणे यांनी पक्षाने दाखविलेल्या विश्वासाबद्दल समाधान व्यक्त केले. पक्षाचे राष्ट्रीय नेतृत्व, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तसेच सर्व ज्येष्ठ नेत्यांचे त्यांनी मनःपूर्वक आभार मानले. पक्षाची विचारधारा, धोरणे आणि संघटन अधिक बळकट करत कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधणार आहे. सामान्य नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत आगामी महानगरपालिका निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला यश मिळवून देण्यासाठी पूर्ण निष्ठेने व प्रामाणिकपणे काम करणार आहे, असे सोनवणे यांनी सांगितले.दरम्यान, या नियुक्तीमुळे छत्रपती संभाजीनगर शहरातील राजकीय हालचालींना वेग येणार असून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) आगामी निवडणुकांसाठी सज्ज झाल्याचे संकेत मिळत आहेत. संघटन मजबूत करणे, बूथनिहाय तयारी, मतदारांशी संवाद आणि स्थानिक प्रश्नांवर आधारित प्रचार यावर भर देण्यात येणार असल्याचे पक्षाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. खा.बजरंग सोनवणे यांना निवडणुकीचा मोठा अनुभव असल्याने त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे.



# केसांना मिळेल नैसर्गिक कंडिश्नर घरच्या घरी करा 'या' सोप्या टिप्स फॉलो

हिवाळ्याचा हंगाम आपल्या त्वचेवर चमक आणतो, परंतु यामुळे इतर अनेक समस्या देखील येतात, त्यापैकी सर्वात मोठी म्हणजे कोरडे आणि निर्जीव केस. या ऋतूत केसांची निगा राखण्यासाठी डीप-कंडिशनिंग खूप महत्वाचे आहे. परंतु, आपण ते फक्त मार्केट कंडिशनरमधून मिळवू शकत नाही. अशा परिस्थितीत, आपल्याला होममेड कंडिशनिंग रेसिपीजचा प्रयत्न करावा लागेल, ज्यामुळे आपल्याला मऊ आणि कंडिशन्ड केस मिळविण्यात मदत होईल. खरं तर, आरोग्याप्रमाणेच केसांची काळजी घेणे महत्वाचे आहे. चला तुम्हाला नॅचरल डीआयवाय कंडिशनर सांगूया, जे केसांच्या सर्व प्रकारांसाठी फायदेशीर ठरू शकते. हिवाळ्यातील थंड आणि कोरडी हवा केवळ आपल्या त्वचेवरच नाही, तर केसांवरही विपरीत परिणाम करते.हिवाळ्याच्या ऋतूमध्ये हवेतील ओलावा कमी झाल्यामुळे केस कोरडे, निर्जीव आणि निस्तेज होतात. केसांची नैसर्गिक आर्द्रता टिकवून ठेवण्यासाठी आणि हिवाळ्यातील समस्यांपासून बचाव करण्यासाठी योग्य निगा राखणे अत्यंत आवश्यक आहे. हिवाळ्यात केसांच्या मुळांची त्वचा कोरडी पडते, ज्यामुळे कोंडा आणि खाज येण्याचे प्रमाण वाढते. हे रोखण्यासाठी आठवड्यातून किमान दोनदा कोमट तेलाने केसांच्या मुळांशी मालिश करावी. नारळ तेल, बदाम तेल किंवा तिळाचे तेल यासाठी उत्तम आहेत. मालिश केल्यामुळे रक्तभिसरण सुधारते आणि केसांना पोषण मिळते.

तसेच, शॅम्पू केल्यानंतर 'कंडिशनर' लावणे विसरू नका. शक्य असल्यास महिन्यातून दोनदा 'हेअर मास्क' किंवा घरामध्ये उपलब्ध असलेल्या दही, मध आणि कोरफडीचा वापर करून केसांना डीप कंडिशनिंग करावे. यामुळे केसांमधील ओलावा टिकून राहतो आणि ते मऊ होतात. खूप थंडी असल्यामुळे अनेकजण केस धुण्यासाठी कडक गरम पाण्याचा वापर करतात. मात्र, अति गरम पाणी केसांमधील नैसर्गिक तेल काढून टाकते, ज्यामुळे केस अधिक कोरडे आणि राठ होतात. नेहमी कोमट पाण्याचा वापर करावा आणि शेवटी केस धुताना थंड पाण्याचा एक हबका मारावा, जेणेकरून केसांची छिद्रे बंद होतील आणि चमक टिकून राहील. तसेच, हिवाळ्यात केस वारंवार धुवू नयेत; आठवड्यातून दोन ते तीन वेळा केस धुणे पुरेसे आहे. सौम्य आणि सल्फेट-मुक्त शॅम्पूचा वापर केल्यास केसांचे नुकसान कमी होते. केस ओले असताना



बाहेर गेल्यास थंडीमुळे ते लवकर तुटू शकतात, म्हणून केस वाळवणे गरजेचे असते. परंतु, हेअर ड्रायरचा अति वापर केसांसाठी घातक ठरू शकतो. ड्रायरमधून निघणारी गरम हवा केसांना अधिक कोरडे करते. शक्यतो केस नैसर्गिकरित्या कोरडे होऊ द्यावेत किंवा ड्रायर वापरायचा असल्यास तो 'कूल मोड' वर ठेवावा. तसेच, स्ट्रेटनिंग किंवा कर्लिंग यांसारख्या उष्णता देणाऱ्या उपकरणांचा वापर टाळावा. ओले केस कधीही विंचरू नयेत, कारण या स्थितीत केसांची मुळे कमकुवत असतात. केस विंचरण्यासाठी रुंद दात्यांचा लाकडी कंगवा वापरावा, ज्यामुळे केस गळणे कमी होते. बाहेर पडताना केसांना थंडीपासून वाचवण्यासाठी रेशमी स्कार्फ किंवा टोपीचा वापर करावा. मात्र, टोपी थेट केसांवर घालण्यापूर्वी खाली रेशमी कापड ठेवावे, जेणेकरून घर्षणामुळे केस तुटणार नाहीत. केसांच्या आरोग्याचा थेट संबंध आपल्या आहाराशी असतो. हिवाळ्यात पुरेशा प्रमाणात पाणी प्यावे, जेणेकरून शरीर आतून हायड्रेट राहील. आहारात सुका मेवा (बदाम, अक्रोड), हिरव्या पालेभाज्या, आवळा आणि ओमेगा-३ युक्त पदार्थांचा समावेश करावा. प्रथिनेयुक्त आहार घेतल्यास केसांची मुळे मजबूत होतात आणि थंडीच्या काळातही केसांचे नैसर्गिक सौंदर्य कायम राहते.

केळी - केळी एक नैसर्गिक मॉइश्चरायझिंग एजंट आहे, जे कोरड्या आणि फ्रिझी केसांसाठी उत्तम आहे. पिकलेले केळी मॅश करून त्यात मध, अंडी आणि दूध घाला. ही पेस्ट आपल्या केसांना लावा आणि ३० मिनिटे ठेवा. नंतर शॅम्पूने धुवा. केळीमध्ये व्हिटॅमिन बी ६, पोटॅशियम, प्रथिने आणि इतर पोषक द्रव्ये समृद्ध असतात. हे आपल्या टाळू आणि केसांचे खोलवर पोषण करते.

दही - दह्यामध्ये प्रथिने आणि लॅक्टिक ऍसिड असते, ज्यामुळे केस मऊ आणि गुळगुळीत होतात. दही, केळी, मध आणि ऑलिव्ह ऑईल मिसळून पेस्ट बनवा. ते आपल्या केसांना लावा आणि ३० मिनिटे ठेवा. नंतर धुवून घ्या. यात मऊ आणि दाहक-विरोधी गुणधर्म आहेत.


कोरफड - कोरफड हे नैसर्गिक अमृतापेक्षा कमी नाही, कारण ते पीएच संतुलन पुनर्संचयित करते आणि केसांच्या वाढीच्या प्रक्रियेस उत्तेजन देते. एका वाडग्यात फक्त चार चमचे कोरफड थोडासा लिंबाचा रस मिसळा. हे मिश्रण आपल्या केसांवर लावा आणि पाच ते दहा मिनिटे सोडा. नंतर शॅम्पू आणि कंडिशनरने धुवा. आठवड्यातून दोनदा ही प्रक्रिया पुन्हा करा आणि मऊ, दाट केसांचा आनंद घ्या.

# फॅमिली फ्लोटर किंवा वेगळी पॉलिसी घ्या? आरोग्य विमा घेण्यापूर्वी 'या' गोष्टी जाणून घ्या

तुमचे आणि तुमच्या कुटुंबाचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी आरोग्य विमा ही आजच्या काळातील सर्वात मोठी गरज आहे. तथापि बहुतेक लोक संभ्रमात आहेत की संपूर्ण कुटुंबासाठी 'फॅमिली फ्लोटर' योजना घ्यावी की प्रत्येकासाठी स्वतंत्र 'वैयक्तिक' धोरण घ्यावे.या निर्णयाचा थेट परिणाम तुमच्या बँक बॅलन्सवर आणि गरजेच्या वेळी मिळणाऱ्या उपचारांवर होतो. विमा तज्ज्ञ असे सांगतात की, योग्य निवड करण्यासाठी आपण आपल्या कुटुंबाचा वैद्यकीय इतिहास आणि सदस्यांचे वय बारकाईने पाहिले पाहिजे.

**तरुण कुटुंबांसाठी फॅमिली फ्लोटर सर्वोत्तम**

बिझनेस स्टँडर्डच्या अहवालात अनेक तज्ज्ञांनी आपले मत व्यक्त केले आहे. युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्सच्या चीफ टेक्नॉलॉजी ऑफिसर आरती मलिक यांचा असा विश्वास आहे की, जे कुटुंब अद्याप तरुण आहे त्यांच्यासाठी फॅमिली फ्लोटर पॉलिसी सर्वोत्तम आहे.त्यांच्या मते, या योजना बजेटमध्ये बसतात आणि रुग्णालयात दाखल झाल्यास पूर्ण संरक्षण देतात. झेश्रळलूररररी.लो येथील आरोग्य विमा व्यवसायाचे प्रमुख सिद्धार्थ




सिंघल देखील सहमत आहेत. ते म्हणतात की २० ते ३० वयोगटातील लोक एकाच फ्लोटर प्रीमियममध्ये त्यांच्या कुटुंबातील ३-४ सदस्यांना सहजपणे कव्हर करू शकतात. आर्थिकदृष्ट्या हा अतिशय फायदेशीर करार असल्याचे सिद्ध होते.

**वैयक्तिक योजना असणे का महत्वाचे आहे?**

वयानुसार आरोग्याशी संबंधित आव्हानेही वाढू लागतात. आनंद राठी इन्शुरन्स ब्रोकर्सचे मिलिंद तायडे म्हणतात की, जेव्हा पालक ३० किंवा ४० च्या दशकाच्या उत्तरार्धात पोहोचतात तेव्हा त्यांनी सावधगिरी बाळगली पाहिजे. अशा परिस्थितीत, जर कुटुंबातील एका सदस्याने वारंवार दावा केला तर शेअर कव्हरेज (फ्लोटर) संपू शकते. तायडे सल्ला देतात की प्रौढांनी जोखीम शेअर करण्यासाठी त्यांचे स्वतःचे स्वतंत्र धोरण घ्यावे, तर मुलांना फ्लोटर योजनेत ठेवले जाऊ शकते.

**जुनाट आजारांपासून बचाव करण्याचा मार्ग**

सिद्धार्थ सिंघल सुचवतात की ४० आणि ५० च्या दशकातील लोकांनी वैयक्तिक योजना निवडली पाहिजे. याचा फायदा असा होतो की एखाद्याला जुनाट किंवा दीर्घकाळ आजार झाला तर संपूर्ण कुटुंबाचे विमा संरक्षण संपत नाही.स्के अर इन्शुरन्सचे व्यवस्थापकीय संचालक राकेश कुमार, असेही म्हणतात की वैयक्तिक योजना वेगवेगळ्या आयुष्याच्या टप्प्यांवर सदस्यांसाठी अधिक प्रभावी असतात. हे प्रत्येक सदस्याला त्याच्या/तिच्या गरजेनुसार संपूर्ण कव्हरेज मिळविण्यास अनुमती देते.

**निर्णय घेण्यापूर्वी या गोष्टी लक्षात ठेवा**

आरोग्य विमा निवडताना काही महत्त्वाचे मुद्दे नेहमी लक्षात ठेवा. जर तुम्ही तरुण असाल तर तुम्ही फॅमिली फ्लोटरने पैसे वाचवू शकता. परंतु जर कुटुंबातील एखाद्यास आधीच गंभीर आजार असेल तर वैयक्तिक योजना घेणे शहाणपणाचे आहे.तज्ज्ञांच्या मते, वाढत्या वयानुसार वैयक्तिक योजनांचे मूल्य वाढते. शेवटी, विम्याची निवड आपल्या कुटुंबाच्या सद्य आरोग्याची स्थिती आणि भविष्यातील गरजा यावर आधारित असावी

# ATM् मध्ये एका वेळेला किती लाख रुपये असतात; आकडा वाचून चकितच व्हाल!

रोख रकमेची गरज असली की बँकेत जाण्याऐवजी आपण अगोदर एटीएममध्ये जातो. ATM ही अशी मशीन असते ज्यात आपण - ATM् कार्ड टाकताच कॅश पैसे मिळतात. पण अनेकदा एखाद्या ATM मध्ये पैसेच नसतात. त्यामुळे आपली चांगलीच पंचाईत होते. दरम्यान, एका ATM् मध्ये बँक किती रुपये टाकू शकते. एटीएम बाहेरून खूप साधे आणि सरळ वाटते. आपण एटीएम कार्ड आणि पीन कोड टाकला की लगेच आपल्याला कॅश नोटा मिळतात. पण ATMचालवण्यासाठी एक विशेष यंत्रणा काम करत असते. तुम्ही जेवढा आकडा दाबला तेवढेच पैसे तुम्हाला मिळतात.ATM मशीनमधील पैसे संपले की त्यात पुन्हा एकदा बँकेचे कर्मचारी पैसे टाकतात. ATM मध्ये एक कॅश बॉक्स असतो. या कॅश बॉक्समध्ये नोटा टाकल्या जातात. एका वेळी -ढच् मशीनमध्ये साधारण आठ ते दहा हजार नोटा टाकता येतात. म्हणजेच एटीएममध्ये टाकलेल्या सर्वच नोटा जर ५०० रुपयांच्या आहेत, असे गृहित धरले तर एका वेळी -ATM मध्ये ४० ते ५० लाख रुपये टाकता येतात. परंतु एटीएमचे ठिकाण, त्या ATM चा होत असलेला वापर यावरून संबंधित ATM मध्ये किती रुपये टाकायचे याचा निर्णय बँक घेते. त्यानुसारच काही ATM् मध्ये कमी पैसे टाकले जातात. तर काही मशीन्समध्ये टाकलेली रक्कम जास्त असते. दुसरी बाब म्हणजे ATM मध्ये फक्त ५०० रुपयांचीच नोट नसते. ATM मध्ये १००, २०० आणि ५०० रुपयांच्या नोटा असतात. म्हणजेच एका ATM मशीनमध्ये साधारण २० ते ३० लाख रुपयांपर्यंत रोख रक्कम असू शकते.



# अजित पवारांना महायुतीत राहण्याचा अधिकार नाही
# दोन्ही राष्ट्रवादींच्या मनोमिलनावरून संजय राऊतांचा इशारा

**मुंबई (वृत्तसंस्था)**–राज्यातील नगरपालिका निवडणुकांचा टप्पा पार पडल्यानंतर आता सर्वच राजकीय पक्षांनी आगामी महापालिका निवडणुकांसाठी कंबर कसली आहे. मुंबईत शिवसेना ठाकरे गट आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्यात युतीचे संकेत मिळत असून, उद्याच त्यांचे जागावाटप जाहीर होण्याची शक्यता आहे. या घडामोडींमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, मुंबई महापालिकेवर वर्चस्व गाजवण्यासाठी ठाकरे बंधूंनी ही नवी रणनीती आखल्याचे दिसून येत आहे.दुसरीकडे, पुण्यात दोन्ही राष्ट्रवादी गट एकत्र येण्याच्या हालचालींवरून शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर जोरदार प्रहार केला आहे. अजित पवार यांचे नेते आता पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह आहेत, त्यामुळे जर पुण्यात शरद पवारांच्या राष्ट्रवादीसोबत ते हातमिळवणी करणार असतील, तर त्यांना महायुतीत राहण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही, असे राऊत यांनी ठणकावून सांगितले. तसेच, पुण्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्यास शिवसेना ठाकरे शरद पवारांच्या गटासोबत न जाता मनसे आणि काँग्रेसला सोबत घेऊन स्वतंत्रपणे निवडणूक लढवेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.मुंबईतील महाविकास आघाडीच्या भविष्याबाबत बोलताना संजय राऊत यांनी माहिती दिली की, मुंबईत काँग्रेससोबत युती होण्याची शक्यता आता धूसर झाली आहे. मात्र, शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसशी जागावाटपाबाबत चर्चा सुरू असून, ती यशस्वी झाल्यास उद्याच्या पत्रकार परिषदेला शरद पवार स्वतः उपस्थित राहू शकतात. काँग्रेस मुंबईबाहेर इतर काही शहरांमध्ये शिवसेनेसोबत राहू शकते, त्यादृष्टीने अद्याप चर्चा सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले.निवडणुकीच्या या रणधुमाळीत ठाकरे बंधूंसमोर मतदारांना आकर्षित करण्याचे मोठे आव्हान असणार आहे. काँग्रेसने स्वबळाचा नारा दिल्याने दलित आणि मुस्लिम मतांचे विभाजन टाळणे ही त्यांच्यासाठी मोठी कसोटी असेल. तसेच, मुंबईतील उत्तर भारतीय मतदार भाजपच्या पाठीशी उभा राहण्याची शक्यता असल्याने, मराठी बहुल भागातील जास्तीत जास्त मराठी मते आपल्या पारड्यात पाडण्यासाठी उद्धव आणि राज ठाकरे यांना विशेष रणनीती आखावी लागणार आहे.



## महानगरपालिका निवडणुकीत ओबीसी उमेदवारांना प्राधान्य जास्तीत जास्त प्रमाणात द्यावे–श्री.गणेश विद्ये

दैनिक वादळ वाता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

भाजपाच्या ओबीसी विभागाची शहरांमध्ये बैठक संपन्न होऊन सदर बैठकीमध्ये २०२६ अहिल्या नगर महानगरपालिका निवडणुकीत जास्तीत जास्त ओबीसी समाजातील उमेदवारांना भाजपाचे तिकीट द्यावे अशी मागणी बैठकीत करण्यात आली अशी माहिती भाजपा ओबीसी शहर जिल्हा अध्यक्ष गणेश विद्ये यांनी दिली.नुकतेच भाजपाच्या ओबीसी विभागाच्या बैठक संपन्न झाली या बैठकी मध्ये चर्चा करताना अध्यक्ष गणेश विद्ये यांनी अहिल्यानगर महानगरपालिकेत एकूण १७ प्रभागा मध्ये ओबीसी समाजातील उमेदवार इच्छुक असून सदर उमेदवार निवडून येण्यास पात्र आहेत. नुकत्याच महाराष्ट्रात नगर पंचायत व नगरपालिकेच्या झालेल्या निवडणुकीमध्ये मोठ्या प्रमाणात ओबीसी समाजाने महायुतीच्या पाठीशी उभे राहून मतदान केल्यामुळे महाराष्ट्रात मोठया प्रमाणात महायुतीचे उमेदवार निवडून आलेले आहेत.



त्यामुळे होणाऱ्या अहिल्यानगर महानगर पालिका निवडणुकीत ओबीसी समाज अहिल्यानगर मध्ये मोठ्या प्रमाणात असून समाजातील अनेक कार्यकर्ते भाजप काम करीत आहे अशा परिस्थितीत ओबीसी समाजाला न्याय देणे ही काळाची गरज आहे. यावेळी बैठकीमध्ये भाजपा ओबीसी विभागाचे पदाधिकारी कुंडलिक गदादे, ऍड. राजू गाली, रोहित पठारे, विनोद बोगा व सौ स्वाती शिरसुल यांनीही आपले मनोगत व्यक्त करून महानगरपालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने जास्तीत जास्त ओबीसी समाजातील उमेदवारांना उमेदवारी द्यावी अशी मागणी केली. या पदाधिकाऱ्यासह सदर बैठकीत सचिन पळशीकर, श्रीकांत फंड, सुनिता कुरापट्टी जितेंद्र बिज्जा, अभय मड्डूर, लक्ष्मण पालवे,सचिन पालवे, संदीप शहापूरकर, सोमनाथ आव्हाड, सुजित हराळे व सुरेश लोळगे आदि उपस्थित होते.

## कंधार नगरपालिकेत आगळा–वेगळा निकाल
## माजी आमदारांच्या सुनबाईंना पराभूत करत मयुर नळदकर यांचा १५० मतांनी दणदणीत विजय

दैनिक वादळ वाता
**कंधार । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील नगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये अनेक ठिकाणी चुरशीचे सामने पाहायला मिळत असताना नांदेड जिल्ह्यातील कंधार नगरपालिकेत एक आगळा–वेगळा आणि लक्षवेधी निकाल लागला आहे. कंधार नगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १ (ब) मधून एका सामान्य कुटुंबातील कार्यकर्ता मयुर नळदकर यांनी माजी आमदारांच्या सुनबाईंना तब्बल १५० मतांनी पराभूत करत दणदणीत विजय मिळवला आहे.

या विजयामुळे कंधार शहरासह संपूर्ण जिल्ह्यात राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. मयुर नळदकर हे अत्यंत साधी राहणीमान असलेले, सामान्य कुटुंबातील सामान्य कार्यकर्ते असून त्यांनी थेट जनतेशी संपर्क,



घेतले व विजयाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. त्यानंतर काढण्यात आलेल्या विजय मिरवणुकीत त्यांनी नागरिकांशी संवाद साधत मतदारांचे आभार मानले.यावेळी बोलताना मयुर नळदकर म्हणाले,

मला तुम्ही निवडून दिले, याचा मला अभिमान आहे. मी दिलेला शब्द पाळणार आहे. आपल्या प्रभागात लाईट, पाणी, रस्ते, नमूद केले.

एका सामान्य कार्यकर्त्याने ताकदवान राजकीय पार्श्वभूमी असलेल्या उमेदवाराला पराभूत केल्याने हा निकाल लोकशाहीतील जनशक्तीचा विजय मानला जात असून, येणाऱ्या काळात कंधार नगरपालिकेच्या राजकारणात नवे पर्व सुरू होईल, अशी चर्चा नागरिकांमध्ये होत आहे.

# मुंबई महापालिका निवडणुकीत महायुती १५० हून अधिक जागा जिंकणार–आ.प्रवीण दरेकर
## विविध राजकीय पक्षांच्या शेकडो कार्यकर्त्यांचा भाजपात जाहीर प्रवेश

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात निवडणुका होत आहेत. नगरपालिका आणि नगरपरिषद निवडणुकीत १२० जागा भाजपने जिंकल्या. विरोधक नावालाही शिल्लक नाही. उबाठा सेनेच्या केवळ ९ जागा आल्या. जनतेचा भाजपावर विश्वास आहे. येणाऱ्या मुंबई महापालिका निवडणुकीत १५० पेक्षा जास्त जागा महायुती जिंकल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास भाजपा गटनेते आमदार प्रवीण दरेकर यांनी कार्यकर्ता मेळाव्यात व्यक्त केला.मागाठाणे विधानसभा क्षेत्रातील प्रभाग क्रमांक ५ तर्फे आज बोरिवली येथील पाटीदार समाज हॉल येथे कार्यकर्ता मेळावा व जाहीर पक्ष प्रवेश सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ. प्रवीण दरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व जिल्हा अध्यक्ष बाळा तावडे यांच्या हस्ते समीर सरोज यांच्या नेतृत्वाखाली शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपचा झेंडा हाती घेतला.

याप्रसंगी मुंबई भाजपा उपाध्यक्ष प्रकाश दरेकर, सुभाष येरुणकर, मोतीभाई देसाई, शिवाजी चौगुले, मंडल अध्यक्ष अमित उतेकर, महामंत्री संजय घाडी, महिला मोर्चा अध्यक्षा प्रियांका रेडकर, वॉर्डअध्यक्षा मृदुला पवार, वॉर्ड अध्यक्ष तेजस माने, कृष्णा दरेकर, रश्मी भोसले, अशोक कांबळे, कमला राजपुरोहित, ललित शुक्ला, सुरज नवाडकर, आदित्य दरेकर यांसह मोठ्या संख्येने प्रभाग क्रमांक ५ मधील पुरुष आणि महिला कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलताना आ. दरेकर म्हणाले की, भाजपचे उत्तम संघटन असणारा प्रभाग क्रमांक ५ वॉर्ड आहे. भाजपा हा विकासाचा पक्ष आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली देशाला पुढे नेण्याचे काम होतेय. महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महायुती सरकारच्या माध्यमातून विकासाचे राजकारण आम्ही करतोय. जातीपातीवर



राजकारण होत असताना विकासवरही राजकारण होते हे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशाला व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याला दाखवून दिलेय. त्यामुळे मुंबई आज वेगाने बदलताना दिसतेय. मुंबईला आकार महायुती देऊ शकते, विकासासाठी भाजपासारखा दुसरा पक्ष नाही म्हणून आज समीर सरोज यांच्या नेतृत्वाखाली शेकडो युवकांनी भाजपचा झेंडा खांद्यावर घेतल्याचेही दरेकरांनी म्हटले. दरेकर पुढे म्हणाले की, भाजपा शिस्तीचा पक्ष आहे. ज्याला राजकारण पोटात ठेवता येते तो यशस्वी होतो. जगवाटपाची चर्चा सुरु आहे. मागाठाणे हा भाजपचा बालेकिल्ला आहे. युती आघाड्या होत असतात. जास्तीत जास्त जागा मागाठाणेत भाजपाला कशा मिळतील हा प्रामाणिक प्रयत्न करणार असून पक्ष वाढ आणि कमळ फुलविण्यासाठी प्रयत्न करणे ही कार्यकर्ता म्हणून माझी जबाबदारी असल्याचेही दरेकर म्हणाले. दरेकर पुढे म्हणाले की, विकासकामांची चिंता करू नका. केंद्रात व राज्यात आपले सरकार आहे. येणाऱ्या महापालिका निवडणुकीतही सरकार भाजपा महायुतीचेच असणार. महायुती म्हणून मागाठाणेतील सातच्या सात जागा कमळ व धनुष्यबाणाच्या निवडून आणणार आहोत. प्रभाग क्रमांक ५ मधील बूथ अध्यक्ष, कमिटी मेम्बर, बूथ सदस्य यांनी सज्ज राहायला हवे. नियोजन पद्धतीने काम करा. संघटन भक्कम करा, हे संघटन नक्कीच यश मिळवून दिल्याशिवाय राहणार नाही, असा दृढ विश्वासही दरेकरांनी यावेळी व्यक्त केला.

# द्रोणागिरी स्पोर्टसच्या रौप्यमहोत्सवी युवा महोत्सवाचे दिमाखात उदघाटन
## गावोगावची मैदाने सिडकोने गिळंकृत केली–महेंद्रशेठ घरत


दैनिक वादळ वार्ता
**उलवे । प्रतिनिधी**

पनवेल, उरण, नवी मुंबईतील अनेक गावांना शहरीकरणाचा फटका बसला आहे. पूर्वी येथील भूमिपुत्र आपल्या गावाशेजारी मस्तपैकी माळरानावर, मैदानावर खेळायचा, प्रत्येक गावाला गुरचरण होती. मात्र सिडकोने गावोगावची मैदाने गिळंकृत केली. त्यामुळे आज गावातील तरुणांना खेळण्यासाठी मैदानेच नाहीत. शहरीकरणाच्या नावाखाली सिडकोने भूमिपुत्रांची प्रचंड फसवणूक केली आहे. सुखासुखी खेळणाऱ्या गावोगावच्या तरुणांना आपल्याला हक्काचे मैदान मिळावे, म्हणून लढावे लागत आहे. ही शरमेची बाब आहे. द्रोणागिरी स्पोर्टस असोसिएशन गेली २५ वर्षे युवा महोत्सव भरवीत आहे. हे वाटतेय तितके सोपे काम नाही, त्यामुळे संस्थापक अध्यक्ष महादेव घरत यांना



मी सॅल्यूट करतो, ते माझे जुने सहकारी आहेत. द्रोणागिरी स्पोर्टस ही भूमिपुत्रांची संस्था क्रीडा पटूंच्या विकासासाठी गेली २५ वर्षे धडपडत आहे; परंतु त्यांना आजही मैदान मिळू शकले नाही, याची खंत वाटते. आजपर्यंत या व्यासपीठावर अनेक मंत्री आले, पण मैदान मिळाले नाही. कर्नाळा स्पोर्टस, रामशेठ ठाकूर स्पोर्टस कॉम्प्लेक्स यांच्या उभारणीत माझा सिंहांचा वाटा आहे. अलीकडे सिडकोने हजारो एकर जमीन सेझच्या नावाखाली धनदांडग्यांच्या घशात घातली, मात्र भूमिपुत्रांना मैदानांसाठी रस्त्यावर यावे लागतेय, ही सरकारची वृत्ती निषेधार्ह आहे. त्यामुळे येत्या काळात भूमिपुत्रांनो, एकजूट करून पाठपुरावा करू या आणि हक्काने मैदाने मिळवू या. मी माझ्या परीने लढतोय, त्यामुळेच शेलघर, मोरावे, गव्हाण यांसारख्या आठ–दहा गावांना मैदाने मिळवून दिली आहेत. द्रोणागिरी स्पोर्टसची आजपर्यंतची कामगिरी उत्तम आहे. त्यामुळे अनेक खेळाडू घडले आहेत, असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत बोकडविरा–चारफाटा येथे म्हणाले. त्यांच्या हस्ते द्रोणागिरी स्पोर्टस असोसिएशनच्या युवा महोत्सवाचे उदघाटन झाले. यावेळी माजी आमदार मनोहर भोईर उपस्थित होते. यावेळी मनोहर भोईर म्हणाले, द्रोणागिरी स्पोर्टसला मैदान मिळालेच पाहिजे. प्रसंगी त्यासाठी सिडकोला दणका द्यावा लागेल. यावेळी सामाजिक, शैक्षणिक, शासकीय, सांस्कृतिक, कला क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्यांना द्रोणागिरी भूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. विविध शाळांच्या विद्यार्थ्यांनी संचलन, लेझीम पथकाद्वारे मान्यवरांची मने जिंकली.

## सौ.मंजुळा डाकी द्रोणागिरी पुरस्काराने सन्मानित



**पाले । प्रतिनिधी**

उरण पूर्व विभागातील बोरखार गावाच्या रहिवाशी सौ. मंजुळा रामभाऊ डाकी या अनेक वर्षे धवळ गीत धवळारीणीचे कार्यक्रम करत असल्याची दखल घेऊन द्रोणागीरी स्पोर्ट अकॅडमी उरण या संस्थेने सौ. मंजुळा डाकी यांना यावर्षीचा द्रोणागीरी भूषण पुरस्कार प्रदान करून त्यांना प्रमुख पाहुणे मा. माजी आमदार मनोहर भोईर द्रोणगिरी स्पोर्ट असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष मा. महादेव घरत, माजी जि. प सदस्या सौ. वैशाली घरत, महेंद्र घरत ,जिल्हा अध्यक्ष काँग्रेस, मनोज पडते, मनोहर गोरे, काजळ घाडगे, प्रज्ञा म्हात्रे, यशवंत ठाकूर, मनोहर सिंग इत्यादी मान्यवरच्या प्रमुख उपस्थित सौ. मंजुळा डाकी यांना सन्मानचिन्ह प्रशस्ती पत्रक शाळ श्रीफळ देऊन सन्मानित केल्याने कवी वर्य लहुकुमार डाकी, विंधणे ग्राम पंचायतीच्या माजी सरपंच सौ. वैशाली म्हस्कर, माजी सरपंच सौ. निसर्गा डाकी उद्योगजक वैभव डाकी, ग्रामसेवक रविंद्र गावंड, विधितज्ञ ड. धिरज डाकी कुलस्वामी महिला बचत गट अध्यक्ष सौ. विश्रांती पाटील, सामाजिक कार्यकर्ते हेमंत डाकी, जगदीश पाटील, जयवंत ठाकूर, तसेच विविध क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदन केले.

# ईव्हीएम मशिनद्वारे घोटाळा झाल्याची गंभीर शंका-दीपक देशमुख यांचा आरोप

## ८७ मतदान केंद्रांवर कुठेही २७० ते ३०० च्या पुढे मतदानाचा आकडा गाठला गेला नाही, हे संशयास्पद

### गुंड प्रवृत्तीचे कार्यकर्ते मला आणि माझ्या समर्थकांना धमक्या देत आहेत;प्रशासनाची मनमानी पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह? निर्माण करणारी

दैनिक वादळ वार्ता
**परळी । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील परळी नगर परिषद निवडणुकीत ईव्हीएम मशिनद्वारे घोटाळा झाल्याची गंभीर शंका व्यक्त करत माजी नगराध्यक्ष व उमेदवार दीपक देशमुख यांनी परळीत पत्रकार परिषद घेऊन सत्ताधारी पक्षावर थेट आरोप केले. आमच्या विरोधातील प्रमुख दोन पक्षांचे उमेदवार निवडून येऊ नयेत, यासाठी हा डाव रचण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.देशमुख म्हणाले की, परळीतील निवडणुकीदरम्यान ८८ मतदान केंद्रे होती. मात्र प्रभाग क्रमांक १० मध्ये केवळ दोनच उमेदवार होते. एका मतदान केंद्रावर योग्य पद्धतीने मतदान झाले असून त्या ठिकाणी ३०७ मते पडली. मात्र उर्वरित ८७ मतदान केंद्रांवर कुठेही २७० ते ३०० च्या पुढे मतदानाचा आकडा गाठला गेला नाही, हे संशयास्पद असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

निवडणूक आयोगाकडे तक्रार; उउढत फुटेज देण्यास नकार या संदर्भात आम्ही निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. मात्र मतदान केंद्रांवर लावण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज देण्यास प्रशासनाने नकार दिला, ही बाब पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी असल्याचे देशमुख म्हणाले.

**हायकोर्टात दाद मागणार**

या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी, यासाठी राज्य निवडणूक आयोगासह माननीय उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

**धमक्या व गुंडगिरीचे आरोप**



पत्रकार परिषदेत बोलताना दीपक देशमुख यांनी माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या काही कार्यकर्त्यांवर गंभीर आरोप केले. गुंड प्रवृत्तीचे कार्यकर्ते मला आणि माझ्या समर्थकांना धमक्या देत आहेत. खोटे गुन्हे दाखल करून आयुष्य उद्ध्वस्त करू, अशा धमक्या दिल्या जात आहेत, असा आरोप त्यांनी केला.
तसेच परळी नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा यांचे पती बाजीराव धर्माधिकारी यांच्याशी संबंधित व्यक्तींकडूनही जीवाला धोका असल्याचा आरोप देशमुख यांनी केला. शहरात गुटखा, मटका, बनावट दारू यांसारखे बेकायदेशीर धंदे खुलेआम सुरू असून, या माध्यमातून गुंडगिरी वाढवली जात आहे, असेही ते म्हणाले.

**पोलीस अधीक्षकांकडे तक्रार देणार**

या धमक्यांच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कौवत यांची भेट घेऊन तक्रार देणार असल्याचे देशमुख यांनी स्पष्ट केले.

**निवडणूक पुन्हा बॅलेट पेपरवर घेण्याची मागणी**

शरद पवार गटाच्या उमेदवारांसह आम्ही संयुक्तपणे मागणी करतो की, परळी नगर परिषद निवडणूक पुन्हा एकदा बॅलेट पेपरवर घ्यावी. याचा सर्व खर्च देण्यास आम्ही तयार आहोत, असेही देशमुख यांनी सांगितले. घटनेने दिलेल्या अधिकारानुसार ही मागणी असून, निवडणूक आयोगाने पारदर्शक पद्धतीने यावर निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या खळबळ जनक पत्रकार परिषदेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष बाबा शिंदे, उत्तम माने, महादेव गंगणे, शेख शरीफ, नितीन चव्हाण, पंडित झिंजुर्डे, संजय जगतकर, अधी उपस्थित होते.

# टोकवाडी ग्रामपंचायतीला गट विकास अधिकारी राजवर्धन भोसले यांची भेट; विकासकामांची पाहणी




दैनिक वादळ वार्ता
**परळी । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत परळी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी राजवर्धन भोसले यांनी टोकवाडी ग्रामपंचायतीला भेट देऊन सुरू असलेल्या व प्रस्तावित विकासकामांची पाहणी केली. आदर्श शाळेला भेट देत शैक्षणिक सुविधा, स्वच्छता व शिस्तीचा आढावा घेत विद्यार्थ्यांशी संवाद साधला.
अभियानातील आठ प्रमुख घटकांबाबत सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, शिक्षक व ग्रामस्थांना मार्गदर्शन करण्यात आले. विस्तार अधिकारी भताने व शेंडगे यांनी गुणांकन, दस्तऐवजीकरण व लोकसहभाग याबाबत तांत्रिक मार्गदर्शन केले. गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळून अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी ही भेट महत्त्वाची ठरल्याचे भोसले यांनी सांगितले.

# केज प्रशासनाने मला मारायचा विडा उचलला आहे का?बेमुदत उपोषणा ९ वा दिवस,सर्वांना शेवटचा रामराम-रोहन गलांडे पाटील

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**




चिंचोली माळी ता.केज येथे विविध प्रलंबित नागरी व शासकीय मागण्यांच्या पूर्ततेसाठी रोहन गलांडे यांनी बेमुदत आमरण उपोषणास सुरुवात केली आहे. बुधवार दि.१७ डिसेंबर रोजी सायंकाळी ७-३० वाजता संत नामदेव महाराज मंदिर येथे ते उपोषणास बसले आहेत.काही मागण्या मान्य झाल्या आहेत परंतु एक दोन मागणीसाठी रोहन गलांडे पाटील यांना जिवे मारायच ठरवले आहे असे चिन्ह दिसत आहेत कारण अमरण उपोषणाचा नववा दिवस आहे रोहन गलांडे पाटील यांची प्रकृती चिंताजनक झाली आहे व रोहन गलांडे यांनी जनतेला शेवटचा रामराम घ्यावा असे म्हटले आहे.कारण त्यांना बोलताना छातीवर दाब येत आहे,डोके दुखी उम्मघाम होत आहे,छातीत दुखायला सुरुवात झाली आहे,अंग थरथरत आहे एवढ्या वेदना होतात परंतु प्रशासनाला काही घेणे देणे नाही परंतु रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे की मेलो तरी चालेल पण मागण्या मान्य झाल्या शिवाय अमरण उपोषण मागे घेणार नाही.या विषयी सविस्तर वृत्त असे की चिंचोली माळी येथील उर्वरित अतिक्रमण तात्काळ हटवून छत्रपती संभाजी महाराज चौक (नागबेट वस्ती) ते संत नामदेव महाराज मंदिरा पर्यंत रस्ता व नालीचे काम त्वरित सुरू करण्यात यावे,अशी प्रमुख मागणी त्यांनी केली आहे.तसेच केज तालुक्यातील विहीर, गायगोठा व घरकुल योजनेचे प्रलंबित हप्ते तात्काळ लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावेत,अशी मागणीही उपोषणातून करण्यात आली आहे.यासोबतच चिंचोली माळी ग्रामपंचायत हद्दीतील नामदेव महाराज परीसरातील अतिक्रमण हटविण्यासाठी आता नऊ दिवस झाले अमरण उपोषणाला बसले आहेत.दि.११ डिसेंबर २०२५ रोजी तहसीलदार यांना निवेदनाद्वारे सादर केलेल्या सर्व मागण्या मान्य करण्यात याव्यात मागण्यांसाठीच हे आमरण उपोषण सुरू करण्यात आल्याचे रोहन गलांडे यांनी सांगितले आहे.मागण्या मान्य होई पर्यंत उपोषण सुरूच राहील,असा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.केज तहसीलदार बीडीओ यांनी बांधकाम पटेल साहेब यांनी ग्रामपंचायत सरपंच सुनील देशमुख यांनी ग्रामसेवक यांनी तातडीने उद्या अतिक्रमण काढण्यासाठी सुरवात केली तर ठीक आहे नाहीतर प्रशासनान जबाबदार राहतील परंतु मेलो तरी हरकत नाही दिलेला शब्द पाळवा.

# प्राचार्य डॉ.वसंत माळी यांना गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार जाहिर,कुलगुरू ज्ञानदेव मस्के,प्राचार्य बाबासाहेब गोरे,सुभाष सारडा यांचाही होणार सन्मान

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**




उल्हासनगर येथील जे. वाटुमल साधुबेला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत माळी यांना आष्टी येथील भगवान कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वतिने आयोजित गंगाई-बाबाजी कला महोत्सवाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त (२०२५-२६)आदर्श पुरस्कार जाहिर झाला आहे.उच्च शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल हा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार जाहिर झाला आहे.दि.१ जानेवारी २०२६ रोजी आष्टी येथे या पुरस्काराचे वितरण होणार आहे.डॉ.वसंत माळी हे मुंबई विद्यापीठाच्या वनस्पती शास्त्र अभ्यास मंडळाचे चेअरमन असुन ते मुंबई विद्यापीठाच्याअधिसभेवर प्राचार्य गटातुन सदस्य म्हणून ही काम पहात आहेत.डॉ.वसंत माळी यांनी आपल्या अध्यापनाची सुरूवात बीड जिल्ह्यातील कडा येथील आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालयातील वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख म्हणून केली.ते या महाविद्यालयात जुन १९९२ ते २०१६ पर्यंत कार्यरत होते.२०१६ पासुन ते जे.वाटुमल साधुबेला महाविद्यालय, उल्हासनगर चे प्राचार्य म्हणून ते काम पहात आहेत.डॉ.माळी यांनी आपल्या शैक्षणिक संशोधनातून वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय परिषदामधुन वनस्पती शास्त्र विषयात विद्यार्थी व संशोधकांना मार्गदर्शन केले आहे. थायलंड,दुबई,व्हियेतनाम व इतर विविध देशात आंतरराष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन केले आहे.प्राचार्य डॉ.वसंत माळी यांच्या या यशा बद्दल साधुबेलाएज्युकेशन सोसायटीचे चेअरमन माजी खासदार उत्तम सिंग पवार,सचिव नितीन बागवे,माजी आमदार भिमराव धोंडे,प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# केजच्या न्यायालयातील सर्वपरिचित व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड!

## जेष्ठ विधिज्ञ जनार्धनराव आदमाने यांचे निधन

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज येथील प्रसिद्ध वकील अड.जनार्धनराव आदमाने यांचे बुधवारी पहाटे अल्पशा आजाराने बीड येथे निधन झाले.



केजच्या न्यायालयाला सतत 'व्हायब्रेट' ठेवून चैतन्य निर्माण करणारे जेष्ठ विधिज्ञ जनार्धनराव आदमाने यांचे केजच्या वकिली व्यवसायात अत्यंत आदराचे स्थान होते.वयाच्या ८५ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.वकिलीव्यवसायात राहून इंग्रजी विषयावरील त्यांचे प्रभुत्व व संवाद कौशल्याने त्यांनी इतरांवर मोठी छाप टाकली होती. केज येथून इंडियन एक्सप्रेस सारख्या राष्ट्रीय दैनिकाचा प्रतिनिधी म्हणून त्यांनी काम पाहिले.त्यांच्या या ज्ञान व संवाद कौशल्याचा अनेकांना हेवा वाटायचा. अवघड व कठीण वाटणारे इंग्रजी भाषेतील मसुद्यांचा मराठी भाषेत अनुवादीत करण्यासाठी अनेक लोक त्यांचे मार्गदर्शन घेत असत.
त्यांच्या अवांतर ज्ञानाचा आवाका ही खूप मोठा होता.खुप सामान्य व साधेपणाचे जीवन जगताना त्यांचा पेहराव अत्यंत टापटीपीचा व शिस्तबद्ध असायचा. वयाच्या सत्तरी नंतर कडाक्याच्या थंडीतही त्यांचं धावणे व व्यायाम सुरूच होता.सकाळी पहाटे चार वाजता उठून त्यांच्या संपर्कातील लोकांना ते दरवाजावर हाक देऊन जागे करायचे.
त्यांचे जीवन नवीन पिढीला प्रेरणादायी होते. ते धारूर तालुक्यातील अंजनडोह येथील मूळ निवासी होते.बुधवार दि. २४ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात पत्नी व तीन विवाहित मुली आहेत.सध्या ते बीड येथे मुलीकडेच राहत होते. त्यांच्या सर्वच मुलींनी त्यांची अखेरपर्यंत खुप सेवा करून त्यांना मुलगा नसल्याची उणीव कधीच भासू दिली नाही.त्यांच्या पार्थिवावर बुधवारी सकाळी ठीक ११ वाजता बीड येथील संत भगवान बाबा स्मशानभूमीत येथे अंत्यसंस्कार पार पडले. यावेळी नातेवाईकांसह, इतर विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.
केज न्यायालय,रोटरी क्लब ऑफ इंडिया केज, सर्व सामाजिक संस्था व केजवासियांच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

## उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांविरोधात पंचायत समितीत खुर्चीला हार

# वंचित बहुजन आघाडी आक्रमक; उशिरा येणे,गैरहजेरी आणि सही करून पलायन

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज पंचायत समिती कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या अनियमित उपस्थितीविरोधात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. यावेळी गटविकास अधिकारी यांना निवेदन देण्यात आले असून, कार्यालयातील गैरशिस्तीचा निषेध म्हणून अधिकाऱ्याच्या खुर्चीला हार घालून लक्षवेधी आंदोलन करण्यात आले.
निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, पंचायत समितीतील विविध विभागांमध्ये कार्यरत असलेले अनेक कर्मचारी नियमित वेळेत कार्यालयात उपस्थित राहत नाहीत. काही कर्मचारी सातत्याने उशिरा येतात, तर काही पूर्णतः गैरहजर राहत असल्याचे प्रकार घडत आहेत. तसेच काही कर्मचारी फक्त एकदाच येऊन हजेरी रजिस्टरवर सही करून उपस्थिती दाखवून पुन्हा कार्यालयातून निघून जात असल्याचेही निदर्शनास आले आहे.या प्रकारामुळे पंचायत समितीअंतर्गत येणाऱ्या सामान्य नागरिकांची कामे वेळेवर होत नाहीत. नागरिकांना वारंवार कार्यालयात फेऱ्या माराव्या लागत असून त्यांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. शासकीय कार्यालयातील शिस्त, वेळेचे पालन व जबाबदारी यावर याचा गंभीर परिणाम होत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.या अनियमिततेकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी यावेळी अधिकाऱ्याच्या खुर्चीला हार घालून निषेध नोंदवण्यात आला.
पंचायत समिती कार्यालयातील सर्व विभागांमध्ये बायोमेट्रिक हजेरी प्रणाली सक्तीने लागू करावी, बायोमेट्रिकशिवाय कोणतीही उपस्थिती ग्राह्य धरू नये, वेळेचे पालन न करणाऱ्या व गैरहजर कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करावी, तसेच गटविकास अधिकारी यांचे ड्युटी शेड्युल कार्यालयाबाहेर वारानुसार प्रदर्शित करावे, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली. दरम्यान, सदर मागण्यांची तात्काळ अंमलबजावणी न झाल्यास वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077